## प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 7 Issue 2 NOVEMBER 2014 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद

(मागील अंकांमधून घेतलेले वेचे, अनुवाद : जयंत देशपांडे)

गोर्बाचेव्ह हे केवळ एक कुशल राजनीतिज्ञच नव्हे तर ते एक द्रष्टे आहेत. अलीकडेच त्यांनी या जगाच्या समस्या सोडवण्यात योगदान करण्यासाठी युनायटेड नेशन्सच्या देखरेखीत शास्त्रज्ञ आणि सांस्कृतिक तज्ज्ञांचे एक मंडळ – “शहाण्या व्यक्तींचे मंडळ” – बनवण्याबद्दल लिहून सुचवले. इथे महान आध्यात्मिक उंची गाठलेल्या लोकांचाही समावेश व्हायला हवा असे मला वाटते. फक्त आपल्या गटांपुरता आणि पंथांपुरता विचार करू शकणाऱ्या धार्मिक नेत्यांचा नव्हे तर जे विश्व आणि सृष्टीच्या पातळीवर विचार करू शकतील, अशा लोकांचा समावेश व्हायला हवा. अशा लोकांचा जे उच्च प्रज्ञेशी संपर्क साधू शकतील आणि त्याच्याकडून ज्ञान आणि शक्ती दोन्ही मिळवू शकतील. फक्त ते लोकच या जगाला प्रकाशाकडे नेऊ शकतील कारण या जगाच्या समस्या जशा दिसतात तशा नाहीत. या समस्या खरे तर लोकांच्या समस्या आहेत. या समस्या आहेत – लोभ आणि घृणा. आणि त्या पाठोपाठ येणारे सर्वकाही.

संकुचित मनोवृत्तीचे राजकीय नेते नव्हे तर खरोखरंच शहाणे असणाऱ्या लोकांचे मंडळच या जगाला मार्गदर्शन करू शकते.

एका व्यक्तीला ध्यानासंबंधी गंभीर समस्या होती. तिला ध्यान करणे जमत नव्हते, इतकेच नव्हे तर तिला ध्यानाचा तिटकारा सुद्धा वाटू लागला होता. ऋषींना विचारल्यावर, त्यांनी एक विचित्र कारण सांगितले. मागच्या जन्मात तिचे आध्यात्मिक मार्गदर्शक एक महान आध्यात्मिक गुरू होते. तिने काहीतरी कारणाने त्यांना दुखावले होते आणि त्यांचा अपमान केला होता. आणि ही गोष्ट आता तिच्या आध्यात्मिक प्रगतीच्या आड येत होत होती !

ऋषींनी शोधून काढले की, ते गुरु दूरवरच्या एका पृथ्वीवर तप करत होते. त्या रात्री ऋषी त्या ध्यानसाधिकेला त्या गुरुंकडे घेऊन गेले. ते त्यांच्या समाधीतून बाहेर आले आणि त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. त्यांना ही कल्पना पण नव्हती की त्यांचा अपमान झाला होता ! त्यांनी क्षमा मागितली आणि त्यांच्या तपोशक्तीचा एक भाग त्यांनी तिला दिला आणि साधनेत तिला यश मिळावे अशी कामना केली. आणि त्यानंतर ध्यानासंबंधी तिच्या समस्या संपल्या.

एका साधकाला मदत करण्यासाठी ऋषी कोणत्या सीमेपर्यंत जातात? कोणत्याही !

माझ्या हातून सांप्रदायिक पंथ बनू नये किंवा अशी परंपरा निर्माण होऊ नये जी अनुयायांवर ‘हे करा व हे करू नका’ अशी बंधने घालेल यासाठी मी जागरुकपणे प्रयत्नशील आहे. संपूर्ण स्वातंत्र्यावर माझी निष्ठा आहे आणि केवळ स्वतंत्र असल्यावरच लोक प्रकाशू शकतात. आध्यात्मिक तत्त्वे आणि ध्यानाची तंत्रे विद्यार्थ्यांसमोर मांडण्यापुरता मी माझा सहभाग मर्यादित ठेवतो आणि बाकी सर्व मी त्यांच्यावर सोडतो. नियम त्यांना ठरवावे लागतील व त्यांचे पालन करावे लागेल, जे की अर्थातच फार आवश्यक आहे. लोक निवड करण्यासाठी, ठरवण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी स्वतंत्र आहेत !

कोणीतरी मला विचारले – “तुमचे जीवितकार्य तुम्ही पूर्ण केले का?” मी ह्याच्याबद्दल सखोल विचार केला आणि माझ्या गुरुंचे शब्द मला आठवले : ऋषींचे कार्य तोपर्यंत चालत राहते जोपर्यंत ही सृष्टी अस्तित्वात आहे. आपण कितपत योगदान करू शकतो ह्याचा विचारच फक्त आपण करू शकतो.

माझे जीवितकार्य पूर्ण झाले आहे असे मला वाटत नाही. पण जे काही मी करू शकलो त्याबद्दल मी आनंदी आहे. या कार्याने मला जे शिकवले त्याबद्दल मी खुष आहे. माझ्या मनात कडवटपणा नाही, कोणाबद्दल वाईट भावना नाही, कोणत्या इच्छा नाहीत, कशाचा खेद नाही, कोणत्याही तक्रारी नाहीत. मी प्रचंड प्रेमाने भरलेलो आहे. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

**तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो**

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

**बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात**

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

**आनेकल येथे**

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. ३००/–**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



३ ऑक्टोबर, आयुधपूजेचा दिवस – तपोनगरातील रहिवाशी त्यांच्या गाड्यांना ऊर्जित करताना

## काही ठळक घडामोडी

- २३–११–२०१४ रोजी तपोनगर येथे गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. ह्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी कृपया २०–११–२०१४ पर्यंत मानसा कार्यलयात आपले नाव नोंदवावे.
- २३–११–२०१४ रोजी गुरुजींच्या महासमाधी कार्यक्रमाप्रसंगी आपल्या "Doorways to Light" ह्या पुस्तकाची इलेक्ट्रॉनिक प्रत (इ–बुक) प्रकाशित करण्यात येईल. हे इ–बुक आपल्या www.lightagemasters.com ह्या वेबसाईटवर खरेदी करण्यासाठी उपलब्ध राहील.
- आपल्या लाइट चॅनल्स च्या कामासाठी बांधलेले कार्यालय आणि इन्फर्मेशन सेन्टर असलेल्या नवीन इमारतीचे उद्घाटन २३–११–२०१४ ला होणाऱ्या कार्यक्रमाप्रसंगी करण्यात येईल.
- २०१५ वर्षाचे डेस्क कॅलेंडर २३–११–२०१४ ला होणाऱ्या कार्यक्रमाप्रसंगी प्रकाशित करण्यात येईल. ह्यासाठी विद्यार्थ्यांनी मानसा कार्यलयात १५–११–२०१४ पर्यंत त्यांच्या मागणीची नोंद करावी ही विनंती.
- जानेवारी २०१५ पासून शंबला गटाची नवीन बॅच सुरू होते आहे. ह्यात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कृपया ३१–१२–२०१४ पर्यंत मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे. बाहेरील विद्यार्थी देखील ह्यात प्रवेश घेऊ शकतील. सध्या शंबला गटात असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या सदस्यत्वाचे नूतनीकरण करण्यासाठी ३१–१२–२०१४ पर्यंत नाव नोंदवावे ही विनंती.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०२ | रविवार | शुक्ल दशमी |
| ०६ | गुरुवार | पौर्णिमा |
| १५ | शनिवार | कृष्णाष्टमी |
| २० | गुरुवार | शिवरात्री |
| २२ | शनिवार | अमावास्या |
| २३ | रविवार | गुरुजींचा महासमाधी दिवस |
| २९ | शनिवार | शुक्लाष्टमी |

## तपोनगरातील कार्यक्रम

दर रविवारी – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत
– प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

रविवार ०९ – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता

रविवार १६ – 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता

रविवार २३ – गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम

रविवार ३० – अखंड ध्यान सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत

## गुरुजींचा महासमाधी कार्यक्रम
### २३–११–२०१४, रविवार

सकाळी ११ वाजता स्वागत
वरिष्ठ साधकांचे व्याख्यान
विशेष ध्यान

दुपारी १२.३० वाजता प्रसाद

## आनेकल येथील कार्यक्रम

२४–११–२०१४ रोजी आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात संध्याकाळी ६ वाजता गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

संकलन व अनुवाद : वैशाली जोशी

एका व्यक्तीने माझ्याकडे तक्रार केली की तो रात्री झोपेतून घाबरून जागा होतो. त्याची ही तक्रार त्याच्या लहानपणापासून होती. मी त्याला प्रकाश प्रवहन शिकवले. त्याने प्रवहन सुरू केल्यानंतर त्याची भीती नाहीशी झाली. आता तो मानसा कुटुंबाचा भाग झाला आहे आणि त्याच्या सर्व तक्रारींपासून मुक्त आहे.

– मृदुला मालपानी, बाह्य विद्यार्थीनी

प्रकाश प्रवहन केल्यानंतर आत्ता या क्षणी माझे मन खूप शांत आहे. मी ते मनापासून केले होते आणि मला कुठूनही कोणत्याही प्रकारचा आवाज ऐकू आला नाही. हा एक खूप चांगला अनुभव होता. आम्हाला हे तंत्र शिकवल्याबद्दल आपले आभार.

– श्रुती सी., इ. १०वी, ख्राइस्ट स्कूल, काग्गलीपुरा, बंगलोर

सराव करताना मी सभोवतालच्या गोष्टींपासून अस्पर्श्य, शुद्ध नीरवतेत होते. ह्याच्या सरावाने जातीचे भेदभाव दूर होतील.

– प्रिया, इ. ७वी, पडुर मिडल स्कूल, चेन्नई

आमच्या शाळेत प्रकाश प्रवहन इतर कोणत्याही विषयासारखेच आहे. आम्ही त्याला समान महत्त्व देतो. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांमध्ये खूप बदल पाहात आहोत. त्यांच्या एकाग्रतेत सुधारणा झाली आहे. आता ते खूप शिस्तबद्ध आहेत. प्रकाश प्रवहन आमच्यासाठी फार उपयोगी आहे. आम्ही खूप आनंदाने त्याचा सराव करतो.

– मिस. सुनिता, मुख्याध्यापिका, वात्सल्या प्रायमरी स्कूल, बंगलोर

जुलैच्या शेवटच्या दोन आठवड्यात मी आतड्यांच्या संसर्गामुळे तीव्र पोटदुखीने त्रस्त होते. २ ऑगस्टला मी एका शाळेत प्रकाश प्रवहनाच्या सत्राचे संचालन केले. त्या सत्रात खूप शांतता आणि खूप ऊर्जा होती. मी मनात विचार करत घरी आले की सर्वकाही कसे मला न समजता घडत गेले. एकाएकी माझ्या शरीरावर लाल पुरळ उठून खाज सुरू झाली आणि पाच तास ॲलर्जीचा त्रास सहन करावा लागला. आश्चर्य म्हणजे संध्याकाळपर्यंत मी ठीक झाले, मला खूप आराम वाटला, आणि खूप हलके आणि स्वस्थ वाटत होते. त्या रात्री मी दोन आठवड्यांनंतर दुखण्याविना शांतपणे झोपले. माझ्या लक्षात आले की प्रवहन करून परत आल्यानंतर माझ्यातील सर्व नकारात्मकता आणि दुखणी माझ्या शरीरातून बाहेर पडली.

– अनिता के. ए., स्वयंसेविका

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

तपोनगरातील मुलांच्या पार्कला आच्छादणाऱ्या प्रचंड जुन्या वृक्षावर निसर्गाने आघात केला. हे उंच वृद्ध झाड आतून सुकले होते. जोरदार पाऊस आणि वाऱ्यामुळे ते रात्री पार्कवर कोसळले. तेव्हा सुदैवाने जवळपास कोणीही नव्हते. त्याला लागून असलेल्या बस–स्टॉपचे छत कोसळले आणि भिंती ढासळून त्यांचे तुकडे झाले. ह्या ढिगाऱ्याच्या विचित्र दृश्याने तपोनगरास थोडेसे उदास केले. काही झालं तरी मुलांच्या ह्या पार्कने गुरुजींना खूप आनंदी केले होते जेव्हा ते गावातील मुलांना आनंदाने खेळताना पाहायचे.

काही आठवड्यांनंतर गावकऱ्यांच्या आवश्यक सहमतीनुसार आणि सलोख्याने हा ढिगारा काढला गेला, खेळण्याची साधने पुन्हा उभारली गेली आणि बस–स्टॉपची पुनर्बांधणी झाली. गुरुजींची जी छबी होती तीच तपोनगराची आहे – आतमध्ये स्थितीस्थापकत्व, परिस्थितीचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती व सोशिकता असणारी, थोर आणि सुसंवादाने व्यवहार करणारी, इतरांच्या हितासाठी प्रेमाने पुनर्निर्माण करणारी आणि आव्हाने पुढे ठाकलेली असताना हसतमुख राहून बेबनाव दूर करणारी. तपोनगराने गुरुजींना प्रकट करणे चालू ठेवले आहे आणि ऋषींनी गुरुजींच्या ध्यानसाधकांच्या माध्यमातून कार्य चालू ठेवले आहे. नियमितपणे होणाऱ्या ध्यान वर्गात 'रा' आणि शंबला च्या दुर्मिळ दिव्य ऊर्जा देणे चालू आहे. प्रकाशाद्वारे क्रांती अधिकाधिक पसरते आहे. ऋषींचे निवासस्थान असलेले तपोनगर, गुरुजी ज्या सर्वाचे प्रतीक होते त्याचे प्रकटीकरण करणे चालू ठेवून त्याच्या आध्यात्मिक मुळांच्या चिरंतन स्वरूपाचा पुरावा देत आहे.

गुरुजींच्या दुसऱ्या महासमाधीच्या दिवशी प्रकाश प्रवहन कार्यलयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात येईल. हे, रहिवासी आणि अनिवासी, अशा सर्व तपोनगरवासियांची आपले प्रिय आध्यात्मिक महान गुरू, गुरुजी कृष्णानंदांबद्दल असलेली निष्ठा, प्रेम आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहे. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

सप्टेंबर , २००४

मोठमोठ्या घटना गाजावाजा न होता घडत असतात. उदा. पृथ्वीचा ध्रुव अतिशय हळूहळू सरकतो आहे आणि आपल्या नजरेस पडते की ध्रुवीय बर्फाची टोपी हळूहळू वितळते आहे. ऋतु बदलत आहेत, प्रलयाची तीव्रता वाढते आहे. चांगल्या ऊर्जांचे व वाईट ऊर्जांचे ध्रुवीकरण होते आहे. तुम्ही निरीक्षण केले तर तुमच्या लक्षात येईल. चमत्कार घडत आहेत व ते अत्यंत शांतपणे घडत आहेत. आपल्या व्यक्तिगत जीवनातसुद्धा चमत्कार घडत आहेत. आध्यात्मिक जागृती उदयास आली आहे जी आपण आपल्या अंतरंगात पाहू शकतो. भले आपण फार मोठे साधक नसलो, भले आपण ऋषींची शिकवण तंतोतंत पाळत नसलो तरी आपल्यात एक प्रकारची जागृती घडून आली आहे जी याआधी अस्तित्वात नव्हती. ही जागृती आपल्याला इतरांमध्ये सुद्धा दिसू शकते. जरी प्रत्येक जण बदलत नसेल, विकसित होत नसेल किंवा ध्यानसाधना करीत नसेल तरीही त्याच्यामध्ये ही जागृती होते आहे. ही फार मोठी गोष्ट आहे जी आपल्याला पुढे नेते. हे सर्व मी पार्श्वभूमी तयार करण्यासाठी बोललो.

थोड्या दिवसांपूर्वी पृथ्वीतलावर महान ऊर्जा आणण्यात आल्या. त्यावेळेस अमर व सप्त ऋषी हजर होते. 'ह्या सत्ययुगाच्या ऊर्जा आहेत,' असे म्हणून भगवान श्रीकृष्णांनी ह्या विशेष ऊर्जा बहाल केल्या. इथे जमिनीखाली त्या ऊर्जा स्थापित करण्यात आल्या. याविषयी कोणालाही माहीत नाही कारण त्याची वाच्यता करण्यात आली नाही. पण मी आधी सांगितल्याप्रमाणे महान गोष्टी नेहमी गुपचूप घडतात. आता तुमचे ध्यान अधिक अडथळेमुक्त व गहन होईल. आपल्याला आपल्या विकारांवर सहज मात करणे सोपे जाईल.

प्रत्येक कृष्णजन्माष्टमीच्या दिवशी काही लोकांना किंवा समस्यांना भगवान कृष्णासमोर नेण्याची परंपरा आहे. भगवान कृष्ण माझ्या गुरुंनी मांडलेली प्रत्येक समस्या ऐकून घेतो. माझे गुरु नेहमी अशा समुदायाचे नेतृत्व करतात. ह्या वर्षीही आम्ही पुष्कळ गाऱ्हाणी नेली होती. त्याने प्रत्येक बाबीत मदत करण्याचे आश्वासन दिले. देव आश्वासन देतो तेव्हा ते नेहमीच पाळतो. त्याने लोकांना हा प्रश्न वारंवार विचारला, 'मी तुम्हाला मदत करेन. पण, तुम्ही ऋषींचे का ऐकले नाही? मी ऋषींना डावलू शकत नाही.' अशा प्रकारे मदत करण्यास देव असमर्थ असतो. ऋषी जास्त समर्थ असतात. कृष्ण म्हणाला, 'तुम्ही ऋषींचे ऐकले पाहिजे.' हे पालुपद मी अनेक जणांच्या बाबतीत ऐकले. काही बाबींमध्ये तो म्हणाला, 'मी एका अटीवर ही अडचण पुढे ढकलेन व तुमची पीडा दूर करेन. तुम्ही मला वचन दिले पाहिजे की तुम्ही स्वतःमध्ये परिवर्तन घडवाल. तुम्हाला बदलावे लागेल, त्यानंतरच मी या अडचणीचे निराकरण करेन.'

इथे आपण निराकार परब्रह्माची पूजा करतो जो शुद्ध चैतन्यस्वरूप आहे. आपण अतिशय विशेष पद्धतीने पूजा करतो. आपण फुले, फळे, मंत्र आणि विधींच्या साह्याने पूजा करत नाही. आपण ती ध्यानाच्या साह्याने करतो. ध्यान हा पूजेचा सर्वोच्च प्रकार आहे. आपण समर्पणाच्या द्वारे पूजा करतो. समर्पण देखील पूजेचीच पद्धत आहे. पूजा ही आपल्या प्रेमाची व आदराची अभिव्यक्ती असते. आपण संपूर्ण समर्पण करतो. आपण आपल्या अहंकाराचा त्याग करून पूजा करतो. नेहमी जरी नाही तरी जेव्हा म्हणून शक्य असेल तेव्हा ईश्वराच्या जाणिवेत जगून आपण पूजा करतो.

आपल्या वागण्यातून ईश्वराला प्रकट करून, प्रेम, शांती व अशा सर्व गोष्टी प्रकट करून आपण त्याची पूजा करत असतो. आपली पूजा मंदिरांपुरती सीमित नाही, ध्यानाच्या तासांपुरती सीमित नाही. ईश्वर सर्वत्र आहे. त्यामुळे आपण जिथे असू तिथे पूजा करतो. कोणीतरी माझ्या गुरुंना विचारले, 'तुमचा आश्रम कुठे आहे?' आणि त्यांनी उत्तर दिले, 'संपूर्ण जग माझा आश्रम आहे. ही पृथ्वी माझा आश्रम आहे.'

आपली पूजा मूकपणे आणि अंतरंगात केली जाते आणि ती इतरांच्या पूजेमध्ये ढवळाढवळ करत नाही. ईश्वर सर्वत्र आहे, आपल्या अंतरंगात आहे आणि ही जाणीव आपल्याला कायम असली पाहिजे. आपण त्याला ओळखले पाहिजे पण कुठेतरी देवळात बसलेला देव म्हणून नव्हे. आपण थोडे जरी चिंतन केले तर आपल्याला समजेल की केवळ तोच आपला एकमेव, चिरंतन सखा आहे.

कर्मयोग म्हणजे काय? अनेक लोकांचा ज्यामुळे फायदा होईल असे निःस्वार्थ कर्म करणे म्हणजे कर्मयोग. अशा कर्माच्या पाठीशी महान प्रेम असते. प्रत्येकाच्या ठायी वसणाऱ्या ईश्वराविषयीचे हे प्रेम असते. जर आपण जास्त जणांची, खूप जणांची सेवा करू शकलो तर ती ईश्वरसेवा असते. हे प्रेम मी, माझे कुटुंब आणि माझ्या परिसरापुरते सीमित नसते. आपण जेव्हा अशा रीतीने कर्मयोग करतो तेव्हा मुळात कामाची गुणवत्ता बदलते; आपण भक्तीयोगाचे आचरण करू लागतो. प्रेमाशिवाय योग घडत नाही.

आपल्याला समजले पाहिजे की आपण बदलत असतो. आपण स्वतःचे निरीक्षण करावे. हे बदल मोठे नाट्यपूर्ण किंवा आपल्याला स्वतःला सुद्धा ठळकपणे दिसण्याजोगे असतीलच असे नाही. पण ते असतील हे नक्की. हे बदल कोण घडवून आणते? माणसांमध्ये परिवर्तन घडावे व त्यांना पुढच्या युगात जाण्यास मदत मिळावी यासाठी ऋषींनी जी ऊर्जा प्रसृत केली आहे ती ऊर्जा हे काम करते. आपल्याही नकळत आपल्यात घडत असलेला हा बदल या भौतिक पातळीवर पूर्णपणे प्रकट होण्यास काही काळ लागू शकतो. त्यासाठी १० वर्षे किंवा २० वर्षे किंवा ४०० वर्षे सुद्धा लागू शकतात. काळाचे औचित्य नाही. औचित्य याचे आहे की हा बदल घडतो व साध्या मानवप्राण्यांचे रूपांतरण दैवी जीवांमध्ये होते.

आम्ही जेव्हा जेव्हा याविषयी बोलतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो. जर काही प्रयत्न न करताच आमचे रूपांतरण किंवा आमची आध्यात्मिक उन्नती होणार असेल तर आता ध्यानाची आवश्यकता का आहे? आपण साधना वगैरे सोडून देऊ शकतो, जसे आहोत तसेच राहू शकतो हे खरे आहे. परंतु, माणसाचा जन्म तसेच राहण्यासाठी नाही. या अप्रतिम मनुष्यत्वात त्याच्या अगणित दोषांसोबत असेही काहीतरी आहे जे विशेष आहे. जरी पुष्कळ लोक आहेत तसेच राहिले तरी असेही काही लोक असतील जे लवकर परिवर्तन व्हावे यासाठी नेहमीच तत्पर असतील. ते म्हणतील, '४०० वर्षे, ४० वर्षे, २० वर्षे कशाला थांबायचे? आपण आताच बदलूया. आपण आत्तापासूनच सत्ययुगात राहायला सुरुवात करूया.' ■

# श्री जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर

२७-०७-२०१४

मला वाटते की अडचणी आपल्याला परिवर्तनासाठी मदत करतात. जेव्हा आपण खूप संकटांना तोंड देतो तेव्हा आपण साहजिकपणे नम्र होतो, आपल्याजवळ गर्व असल्यास तो गळून जातो. अडचणी आपल्याला अधिक शहाणं बनवतात व आपल्यात एक प्रकारचा बदल घडून येतो. हे परिवर्तन किती लवकर घडेल ते आपल्यावर अवलंबून आहे. बहुतांश वेळा अडचणी आपल्याला संदेश देतात, आपल्याला काही सांगण्यासाठी त्या येतात. तसेच अनेकदा संकटे आपणच निर्माण करत असतो. त्या परिस्थितीत आपणच आपल्या समस्यांचे कारण आहोत हे आपल्याला किती लवकर समजते त्यावर परिवर्तन अवलंबून असते. ते आपल्याला समजल्यावर परिवर्तनाला सुरुवात होते. आणि परिवर्तनाची प्रक्रिया सुरू असतानाच अडचणीसुद्धा दूर होऊ लागतात. पण आपण संकटांना प्रत्यक्ष तोंड देत असताना हे वास्तव लक्षात येणे कठीण असते. त्यासाठी खूप वेळ लागतो. सर्वसामान्यपणे आपण सारखी तक्रार करत राहतो, कुरकुरत राहतो आणि देवाला व स्वतः सोडून आजूबाजूच्या प्रत्येकाला दोष देत राहतो.

परंतु, मला वाटते की वास्तविकपणे समस्या आपल्याला मदत करतात. कधीकधी आपण समस्यांच्या समाधानासाठी तांत्रिकाची मदत घेण्यासारखे चुकीचे मार्ग चोखाळतो. अशा चुकीच्या मार्गाने गेल्यास उलट आपल्या समस्या अनेक पटीने वाढतील. जर आपल्याला समजले की संकटाचे कारण आपणच आहोत व स्वतःला बदलण्यावर लक्ष केंद्रित केले तर, आपण संकटातून निभावून जाऊ व त्यातून आपले परिवर्तन देखील होईल. ही परिवर्तनाची प्रक्रिया खरंच खूप मजेशीर असते. आपल्या परिवर्तनास मदत करण्यासाठी देवापाशी खूप मार्ग असतात. देवाचा मार्ग सर्वोत्तम असतो आणि देवाला माहीत असते की आपल्यासाठी सर्वात श्रेयस्कर काय आहे.

२४-०८-२०१४

आपले पुस्तक “Doorways to Light” जपानी भाषेत देखील अनुवादित झाले आहे. जपानमध्ये एका माणसाने ते वाचले व वेबसाईटवर टिप्पणी लिहिली. तो म्हणतो की गुरुजींच्या जहाल प्रामाणिकपणाने व विशुद्धतेने तो सद्‌गतित झाला. आपण असे म्हणू शकतो की या पुस्तकाच्या माध्यमातून तो माणूस गुरुजींना भेटला. या पुस्तकात गुरुजींच्या ऊर्जा आहेत. गुरुजींच्या व्यक्तित्वाने त्याला स्पर्श केला. आपण अनुवादिकेचेही कौतुक केले पाहिजे जी आपली जपानमधील विद्यार्थिनी आहे. तिने खूप निष्ठेने ते काम केले आहे. अशा भल्या माणसांच्या माध्यमातून आपल्या कार्याचा विस्तार होतो, गुरुजींचा प्रकाश जपानसारख्या खूप दूरच्या प्रदेशात देखील पसरतो.

मुंबईतील एका भल्या व्यक्तीने मला सांगितले की गुरुजींची प्रत्येक हालचाल अशी असायची, त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व असे होते की आपल्याला कळून येई की ते प्रकाशरूप होते. किती बरोबर बोलल्या त्या. आपण जे करतो, जसे वागतो, त्या म्हणाल्या तसे, ज्या पद्धतीने आपण हालचाल करतो, वस्त्रे परिधान करतो त्या प्रत्येक गोष्टीत आपले व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होत असते. आणि हे आपोआप घडते. आपल्याला माहीत आहे की ध्यानामुळे आपले व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत होण्यास मदत होते. साधना आपल्याला दिव्यत्वाकडे, प्रकाशाकडे नेते. प्रकाशरूप होण्यासाठी ती आपल्याला मदत करते. हे घडल्यानंतर प्रकाश आपल्या माध्यमातून तळपू लागतो.

गुरुजींनी काही विशिष्ट गोष्टी सहज म्हणून सांगितल्या व त्या खऱ्या झाल्या. गुरुजी व अमरजींसारखे महान गुरु भविष्य जाणत होते. हा एक भाग झाला. दुसरा भाग असा आहे की ते ईश्वराशी संपूर्णपणे तद्रूप असल्यामुळे ते जे बोलत ते खरे होई. अर्थात् असे महात्मे नेहमी संपूर्ण मानवजातीच्या भल्याचा विचार करतात. आत्यंतिक प्रेमापोटीच ते इतरांसाठी जगण्यासाठी पृथ्वीवर येतात.

अमरजी आणि गुरुजींनी नवयुगाचे स्वप्न पाहिले व आपण नवयुगाच्या दिशेने वाटचाल करीत आहोत. त्यांची स्वप्ने, त्यांच्या विशुद्ध कामना स्पंद पावू लागतात व इतरांना त्यांच्या स्वप्नांत सामील होण्यासाठी प्रोत्साहन देतात. जेव्हा अधिकाधिक लोक सामील होतात तेव्हा अशा विशुद्ध कामनांना जास्त बळ मिळते. त्यानंतर हळूहळू नवयुग अवतरू लागते.

१४-०९-२०१४

साधक नसलेला एक माणूस महाराष्ट्रातून इथे आला होता. बसने बंगलोर शहरातून तपोनगरला येताना तो बसमध्ये तपोनगरची चौकशी करत होता. ११ किंवा १२ वर्षांच्या एका मुलाने त्या माणसाला सांगितले, ‘तपोनगर; प्रकाश ! मला ती जागा माहीत आहे.’ तो खूप उत्साहाने व आदराने बोलला. लोक तपोनगरचा संबंध प्रकाशाशी जोडतात. शाळकरी मुले आपल्याला प्रकाशाचे लोक म्हणून ओळखतात. मला वाटते की प्रकाश प्रवहनाचे काम करणाऱ्या आपल्या स्वयंसेवकांच्या प्रचंड मेहनतीचे हे प्रमाणपत्र म्हणायला हरकत नाही. अर्थातच ते प्रमाणपत्रासाठी काम करत नाहीत. अमरजी व गुरुजींनी या पृथ्वीवर नवयुगाचे स्वप्न पाहिले. त्यांच्या प्रकाशयुगाच्या स्वप्नात आपण त्यांना साथ देत आहोत. जर पृथ्वीवरच्या सर्व लोकांना सुद्धा अगदी आत्ताच्या क्षणी प्रकाशयुग हवे असेल तर ते आताच सुरू होईल हे आपल्याला माहीत आहे. पण असे होत नाही. आपल्याला वाट पाहिली पाहिजे. तोपर्यंत आपण प्रकाश प्रवहन करत राहिले पाहिजे, शाळकरी मुलांना प्रकाश प्रवहन करायला शिकवित राहिले पाहिजे. त्या लहान मुलाप्रमाणे सर्व मुले हे कार्य अतिशय समरसून करतात.

ध्यान आपल्याला ईश्वराशी जोडते. आपण ध्यान करू लागतो तेव्हा ईश्वराजवळ जाण्यासाठी एक पाऊल पुढे टाकतो. सकारात्मकतेच्या दिशेने, आध्यात्मिक जीवनाच्या दिशेने एक पाऊल उचलतो. पूर्णतया आध्यात्मिक होण्यासाठी वेळ लागतो. पण आपण त्या दिशेने चालायला सुरुवात केलेली असते. ते महत्त्वाचे आहे. आपण ते केल्यावर ईश्वर आपल्याकडे सहस्त्र पाऊले टाकतो. ऋषी चाकोरीबाहेर जाऊन आपल्याला मदत करतात आणि आपल्या अडचणी सोडवतात.

कधीकधी अडचणी ताबडतोब सोडवल्या जात नाहीत. असे का घडते त्याची कारणे आपल्याला समजू शकत नाहीत. कदाचित ती आपली परीक्षा असू शकते. आपल्या सोशिकतेची जर परीक्षा घेतली जात असेल तर अडचणीवर उपाय लगेच सुचवला जात नाही. परंतु माझा असा व्यक्तिगत अनुभव आहे की सर्व समस्या अखेरीस सुटतात. परंतु, जेव्हा समस्या सोडविण्याच्या हेतुने आपण ध्यानमार्गात येतो तेव्हा समस्या सुटल्यानंतर ध्यान थांबवू नये. आपण ध्यान सुरू ठेवले पाहिजे. ध्यान आपल्याला सर्वोच्च पातळीवर नेते. जेव्हा कोणी मदतीच्या अपेक्षेने आपल्याजवळ येतात तेव्हा आपण त्यांना विनम्रपणे व बळजबरी न करता ध्यान करण्यास सांगितले पाहिजे. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजी

जयंत देशपांडे

ही दोन वर्षे किती भराभर सरली. असे वाटते जणू अगदी कालच आपण तपोनगराच्या प्रशांत वातावरणात एका औत्सुक्यपूर्ण आयगुरुजी सत्रात अज्ञात आध्यात्मिक वास्तवांबद्दल त्यांच्याशी बोलत होतो. प्रत्यक्ष आकलनाद्वारे जाणून घेतलेली किंवा उच्चतर सूक्ष्म जगात असलेल्या ऋषींकडून जाणलेली उच्चतर आध्यात्मिक सत्ये, आपल्यासारख्या सामान्य माणसांना समजतील अशा सोप्या पद्धतीने समजावून सांगणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. इस्पितळात अंथरुणावर असताना देखील, ते तितक्याच उत्साहाने सत्ये समजावून सांगत होते, जसे ध्यान शिकवायला सुरुवात केल्यापासून २५ वर्षे ते करत आले होते. त्यांच्या उत्साहाने कुठून तरी आमच्या मनात एक अनोखी आशा जागवली होती, की एखादा चमत्कार त्यांचा कर्करोग दूर करेल आणि ते त्याच भौतिक शरीरात राहून आपल्याला मार्गदर्शन करणे चालू ठेवतील. उलगडू पाहाणाऱ्या भीषण वस्तुस्थितीबद्दल विचार करायची देखील आमची तयारी नव्हती. किंवा कदाचित ती चक्क आमच्यापुढे उभी असून सुद्धा तिच्याकडे पाहाण्याचे धैर्य आमच्यात नव्हते.

ते त्याच शरीरात जगणे चालू ठेवतील अशी आशा आम्ही बाळगणे चुकीचे होते का? स्वतः देवानेच कदाचित आपल्या आत्म्यांमध्ये आशा रुजवलेली असावी, किंवा येथील आपल्या लक्षावधी जन्मांमध्ये आपल्या अस्तित्वालाच आव्हान देणाऱ्या परिस्थितींतून जगल्यामुळे आपल्या अंतरंगात झालेल्या ज्ञानोदयावर कदाचित ती आधारित असेल. आशा करणे हे बहुधा आपल्या स्वभावातच असते.

पण अखेरीस जेव्हा आशा मंदावू लागली तेव्हा त्यांनी आमचे सांत्वन केले आणि ऋषींचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहन दिले, आणि आम्हाला वचन दिले की ते सूक्ष्म स्तरावरून आपल्यापैकी प्रत्येकाला व्यक्तिशः मार्गदर्शन करतील.

ते त्यांच्या जीवनाद्वारे शेवटच्या श्वासापर्यंत आपल्याला शिकवत होते.

गुरुजी नसलेले जग अकल्पनीय होते. पण आपल्याला भौतिक शरीरात त्यांची अनुपस्थिती स्वीकारता यावी आणि दुसऱ्या स्तरावरील त्यांच्या अस्तित्वाची जाणीव व्हावी यासाठी त्यांनी आपल्याला दुसऱ्या स्तरावरून मनोबळ दिले. त्यांनी शिकवलेल्या आध्यात्मिक तत्त्वांनुसार परिपूर्णपणे जगण्याचे आपले प्रयत्न चालू ठेवण्यासाठी त्यांनी आपल्याला शक्ती दिली.

त्यांनी आपल्या जीवनाला एक उद्देश दिला होता आणि आता ही ते आपल्या जीवनाचा उद्देश आहेत. ■

## गुरुजी

वैशाली जोशी

गुरुजींच्या जीवनापासून आपल्याला खूप बोध मिळतो. एक महत्त्वपूर्ण बोध आहे त्यांची त्यांच्या गुरुंवर, ऋषींवर आणि ईश्वरावर असलेली अतूट श्रद्धा. महर्षी अमरांनी दिलेल्या हाकेला ओ देऊन गुरुजी ऋषींच्या कार्यात सहभागी झाले आणि त्यांच्या स्वप्नांची पूर्तता करणे हे स्वतःच्या जीवनाचे ध्येय बनवले.

त्यांच्या जीवनाद्वारे त्यांनी आपल्याला श्रद्धेच्या ताकदीची जाणीव करून दिली. न परतीचा मार्ग निवडल्यानंतर जेव्हा त्यांना मानहानी, खूप हालअपेष्टा आणि दुःखे भोगावी लागली तेव्हा त्यांच्या श्रद्धेने त्यांना कमजोर होऊ दिले नाही. जेव्हा ते अगदी एकटे परिस्थितिशी झगडत होते तेव्हा त्यांच्या श्रद्धेनेच त्यांना स्वतःच्या निश्चयावर ठाम आणि अढळ राहाण्याचे बळ दिले.

गुरुजी म्हणायचे की, "श्रद्धा निर्माण करता येत नाही. ती एकतर आपल्या ठायी असते किंवा नसते." आपल्याला जेव्हा आत्म्याच्या स्तरावर सत्य समजते तेव्हा आपल्या अंतःस्फूर्ती द्वारे आपल्याला त्याची जाणीव होते. हे जाणणे म्हणजे श्रद्धा आणि अशी श्रद्धा डळमळत नाही. ती आपल्याला नेहमी सुरक्षित असल्याची भावना देते आणि त्यासाठी कोणताही पुरावा लागत नाही. ध्यानसाधनेमुळे आपली अंतःस्फूर्ती तीक्ष्ण होते ज्यामुळे आपल्याला सत्याचे पूर्णपणे आकलन होण्यात मदत होते.

पूर्ण समर्पण ही श्रद्धेची कसोटी आहे. गुरुजी ईश्वर आणि ऋषींना समर्पित झाले आणि भौतिक स्तरावर दैवी योजनेचे प्रकटीकरण करण्यासाठी स्वतःला त्यांचे माध्यम बनवले. ह्या पृथ्वीवर ऋषींच्या केंद्राची स्थापना करण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न करून भौतिक, सूक्ष्म आणि कारण ह्या सर्व स्तरांवर कार्य केले. त्यांच्या माध्यमातून ऋषींनी अफाट ज्ञान पृथ्वीवर आणले, मानसी आध्यात्मिक शक्तीचे क्षेत्र आणि मानसा व अंतर-मानसा ही दोन केंद्रे उभारली आणि येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करण्याऱ्या आणि मानवजातीस प्रकाश युगात प्रवेश करता यावा यासाठी मदत करणाऱ्या प्रबळ ऊर्जा स्थापन केल्या.

आपण खूप भाग्यवान आणि धन्य आहोत की अशा महान प्रकाश गुरूंसोबत आपण काही पाऊले चालू शकलो आणि ते आपले चिरंतन मार्गदर्शक प्रकाश आहेत. ■

# प्रश्नोत्तरे

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

**प्र: आपल्यासमोर आपले भवितव्य उघड का केले जात नाही?**

उ: आपल्या समोर आपले भवितव्य उघड केले जात नाही कारण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठी महत्त्वाचे नसते. जेव्हाही ऋषींना वाटते की आपल्या भविष्याबद्दल काही माहिती आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठी उपयोगी ठरेल, तेव्हा ते ती माहिती – कसे न कसे, स्वप्नातून किंवा आपल्याला एकाएकी त्याचे आकलन करून देऊन – आपल्यासमोर प्रकट करतात. जेव्हा आपण आध्यात्मिकरीत्या तयार असतो, तेव्हा आपल्यासमोर भविष्य उघड केले जात असावे.

**प्र: आपण आपली नियती स्वतः घडवण्यापेक्षा, जीवन जसे आहे तसे स्वीकारणे चांगले असते का?**

उ: वास्तवाला देवाचं देणं समजून स्वीकारा, तक्रार करू नका. त्यातून बाहेर पडण्याकरता परमेश्वर संपूर्ण शक्ती आणि शहाणपण तुम्हाला देईल. नवी नियती घडवण्यासाठीच आपण ध्यान करतो.

**प्र: मला पूर्णपणे समर्पण करायचे आहे. मी ते कसे करू शकतो?**

उ: 'तुम्ही असे करा', असे नेमके सांगणे कठीण आहे. मनात ठामपणे ठरवावे लागेल, एव्हढेच. जास्त ध्यान करा, जास्त प्रकाश धारण करा, 'अहम्'ला थारा देऊ नका, आचरणातून प्रेम व्यक्त करा. समर्पणात या सर्वांचा फायदा होईल. पण त्याआधी समर्पणाबद्दल मनात ठरवा आणि त्याची निवड करा.

**प्र: पश्चिमेकडे, सप्तऋषी हे सात प्रकाशकिरण म्हणून ज्ञात आहेत का?**

उ: हो ते खरे आहे. जगाच्या इतर भागांत सुद्धा ते वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात.

**प्र: झाडे त्यांच्यात भूत आणि भविष्याबद्दल माहिती साठवून ठेवू शकतात का?**

उ: ते भूत संचय करू शकतात, पण भविष्य करू शकत नाही. ते आपल्याला ज्ञान, प्रेम, सर्व काही देऊ शकतात. परमेश्वर सर्व गोष्टींमध्ये आहे, सर्वत्र आहे, ह्या वास्तवाची अनुभूति आपण घ्यायला हवी, त्याचा शोध घ्यायला हवा.

**प्र: आपण एखाद्या व्यक्तीला प्रकाश पाठवला तर तिला त्याची जाणीव होते का?**

उ: या पातळीवर ती नेहमी ते जाणू शकणार नाही. पण एका वेगळ्या पातळीवर तिला ह्याच्याबद्दल कळेल. जेव्हा तुम्ही कशाचीही अपेक्षा न करता निरपेक्ष भावनेने हे सुंदर काम करता, तेव्हा विश्व तुम्हालाही प्रेम पाठवते.

**प्र: दोन जन्मांच्या मधल्या काळात, आत्मा हा प्रकाशाच्या महासागरात विश्रांती घेत असतो का?**

उ: नाही. देह सोडल्यानंतर आपल्याला दुसऱ्या एका पृथ्वीवर नेले जाते, जिथे आपण विश्रांती घेतो. आपण आपल्याला हवा तसा फायदेशीरपणे वेळ घालवू शकतो – आपण ध्यान करू शकतो, आनंद लुटू शकतो आणि विश्रांती घेऊ शकतो. आपण पुढील प्रवासापूर्वी इथे वाट पाहात असतो.

**प्र: पिरॅमिडच्या आत बसून ध्यान करण्याचा फायदा होतो का?**

उ: हो त्याने फायदा होतो. ध्यान करताना मनात विचार कमी येतील आणि तुम्हाला जास्त ऊर्जा मिळेल. तुम्ही जास्त प्रमाणात ऊर्जा ग्रहण आणि गोळा करण्यासाठी जास्त सक्षम बनाल. पिरॅमिडच्या आत ध्यान करताना काळात प्रवास करणे सोपे जाते. तुम्ही पिरॅमिडच्या आत प्रत्यक्ष बसण्याची आवश्यकता नाही. तुम्ही कल्पना करू शकता, की तुम्ही पिरॅमिडच्या आत बसला आहात.

**प्र: भारत हा देश नेहमी आध्यात्मिक आकर्षणाची जागा का राहिला आहे?**

उ: त्याची बरीच कारणे आहेत. भारत हे ऋषींसाठी, अवतारांसाठी एकप्रकारचे मुख्यालय आहे. म्हणूनच ते इथे येतात. महान ऋषींनी इथे तप केले आहे. त्यांच्या ऊर्जा अजूनही इथे, संपूर्ण देशभर पसरलेल्या आहेत. लोक या ऊर्जांकडे आकर्षित होतात. इथे जन्म घेणारे आत्मे हे खूप विशेष असतात.

**प्र: तुम्ही म्हणता आपण वेगवेगळ्या पातळ्यांवर अस्तित्वात असतो. मी इथे अस्तित्वात आहे, हे मला ज्ञात आहे. मी इतर सर्व सहा पातळ्यांवर सुद्धा अस्तित्वात आहे ह्याची पण मला जाणीव व्हायला हवी. हे शक्य आहे का?**

उ: आपल्यापैकी कोणालाही आपल्या इतर पातळ्यांवरील अस्तित्वाची जाणीव नसते. पण जेव्हा तुम्ही समाधीच्या सर्वोच्च म्हणजे परिपूर्ण समाधीच्या अवस्थेवर पोहोचता, तेव्हा तुम्ही तुमच्या सर्व पातळ्यांवरील अस्तित्वाबद्दल एकाचवेळी जागरूक राहू शकता. त्या पातळीवर पोहोचणे सोपे नाही. पण ते शक्य आहे. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences - Vol 1 & 2 | each 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आय्गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |

## ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

(संकलन – शोभा राव, अनुवाद – गुरुराज कानाडे)

तपोनगराला दिलेल्या माझ्या प्रथम भेटीमध्ये सप्तर्षी गुहेत ध्यान करीत असताना मला दिसले की गुहेची संपूर्ण जमीन दैवी ऊर्जेने ओतप्रोत भरून स्पंद पावत होती. जमिनीखाली बरीच ऊर्जेची भुयारे दृष्टीस पडली. त्यापैकी एका भुयाराच्या शेवटी तेजस्वी प्रकाश होता. त्यात मी शिरायचा प्रयत्न केला पण ते बंद होते. मी दुसऱ्या एका भुयारात गेलो व समुद्राच्या तळाशी जाऊन पोहोचलो. जेव्हा मी समुद्राच्या पृष्ठभागावर आलो तेव्हा आदिशेषावर विश्राम करत असलेले भगवान महाविष्णू, देवी महालक्ष्मीसह अचानकपणे तेथे प्रकटले !

माझ्या भावाची प्रकृती खूपच चिंताजनक होती म्हणून त्याला हैद्राबाद येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मी त्याला लवकर बरे वाटावे म्हणून कुंडलिनी टॉवरमध्ये प्रार्थना केली. प्रार्थना करीत असताना महर्षी अमरांनी मला दृष्टांत दिला. त्यानंतर मी घरी परतत असताना मला फोन आला की माझ्या भावाची प्रकृती अगदी आश्चर्यकारकरीत्या सुधारली होती व त्याला रुग्णालयातून घरी पाठवण्यात आले होते.

सिंग डी. आर.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी ध्यान करीत असताना माझ्या तीन शिक्षकांनी मला आशीर्वाद दिल्याचे दृश्य मला दिसले. ह्या दृष्टांताच्या शेवटी आपल्या प्रिय गुरुजींनी मला आशीर्वाद दिले. गुरुजींनी माझ्या डोक्याला स्पर्श केला व मी लगेच त्यांच्या कमल चरणी माझे मस्तक ठेवले. मला कृपेने धन्य झाल्यासारखे वाटले व मला ऊर्जा प्राप्त झाल्या. हा एक महान अनुभव होता !

स्वामीनाथन सी.

काही महिन्यांपूर्वी ध्यान करताना, माझ्या श्वसनसंस्थेच्या एका भागाला जंतुसंसर्ग झाल्याचे व तो सर्दीने चोंदलेला असल्याचे मला दिसले. त्यानंतरच्या आठवड्यात मला सर्दी झाली. पण मी त्याकडे रोग्याच्या भूमिकेतून न पाहता अलिप्तपणे पाहिले, जसे काही ते तिऱ्हाईताच्या बाबतीत घडत होते. मला कळले की प्रकाशाशी संलग्न होऊन आपण यातनांना दूर ठेवू शकतो, इतकेच नाही तर अडचणी दूर करण्यासाठी आपल्या कार्ययोजनेवर लक्ष केंद्रित करून अडचणींपासून मुक्ती देखील मिळवू शकतो.

निर्मला बाला

गेल्या दोन दिवसात तपोनगरात माझ्यावर आध्यात्मिक पातळीवर गहन शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. माझ्या शरीरातील अगदी कठीण व चिवट अडथळे काढून टाकण्यात आले आहेत व ते भाग संजीवनीने भरण्यात आले आहेत. मला खूप शांत वाटते आहे. मला परमानंदाने उन्मादित झाल्यासारखे वाटते. ह्या दैवी कृपेबद्दल ऋषी व महात्म्यांचे आभार !

नंदकुमार प्रधान

हा अतिशय उद्बोधक प्रवास व सुरूच राहणारा शिकण्याचा अनुभव आहे. ह्या प्रवासाने मला स्वत:च्या अंतरंगात स्वत:ला शोधून बिनशर्त प्रेमाने, भीती व अपयशांसकट स्वत:चा स्वीकार करण्याचे सोपे पण अगदी प्रभावी धडे शिकवले आहेत. जेव्हा आपण स्वत:वर प्रेम करावयास शिकतो तेव्हाच आपण इतर सर्वांवर बिनशर्त प्रेम करू शकतो. हे सर्व गुरुजींच्या व ऋषींच्या प्रेमामुळे व कृपेमुळे शक्य झाले आहे, जे आपल्याला मानसा परिवाराच्या सदस्यांच्या निस्वार्थी व अथक परिश्रमातून दिसते व जाणवते. ज्यांनी त्यामुळे गुरुजींपश्चात आपल्याला कोणतीही उणीव भासू दिलेली नाही.

कविता मंजुनाथ

मानसा परिवारात साधारण दीड वर्षांपूर्वी मी सामील झालो. तपोनगरातील दैवी प्रेम व शुद्धतेने भरलेले मैत्रीमय वातावरण माझ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे. कॉस्मिक व कुंडलिनी टॉवर मधून प्रसारित होणाऱ्या सकारात्मक स्पंदनांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या साधकांच्या गरजांकडे सतत लक्ष पुरविणाऱ्या दैवी मार्गदर्शकांकडे पाहून सर्व साधक आणखी प्रोत्साहित होतात. जोपर्यंत निसर्ग आड येत नाही तोपर्यंत मला हा अनुभव घ्यावयाचा आहे.

चंद्रशेखर पी.

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande